सं. फौ. ख. क्र.३०/२०१५ निशाणी ८३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – यशवंत विश्वनाथ नागे

वय – ४६ वर्षे, व्यवसाय – पो.हवालदार, पोलीस स्टेशन, बार्शिटाकळी

पत्ता – मलकापूर, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. २४.११.२०१४ रोजी मी पोलीस स्टेशन, उरळ येथे चालक म्हणुन कार्यरत होतो. तेथे कार्यरत असतांना ठाणेदार श्री. काटकर यांना गुप्त बातमीदारा मार्फत अवैधरित्या टँन्कर मधुन डिझेल काढुन विक्री करीत असल्याची बातमी मिळाली. बातमी मिळाल्यानंतर ठाणेदार श्री. काटकर, पो.कॉ. गावंडे, पो.कॉ. हुसेन आणि इतर ३–४ पोलीस कर्मचारी असे आम्ही सरकारी वाहनाने कवठा बॅरेज येथे बातमीच्या ठिकाणी गेलो. सदरचे सरकारी वाहन मी चालवित होतो. त्या ठिकाणी एक मोठया टँन्कर मधुन जमीनीत गाडलेल्या टँकमध्ये काही इसम डिझेल काढण्याचे काम करीत होते. मला ज्या टँन्कर काढले जात होते त्याचा क्रमांक आठवत नाही. टँन्कर मधुन टाकीमध्ये पाईपने डिझेल काढले जात होते. साक्षीदार पुन्हा सांगतात की, पाईपसोबत मोटरपंप होता. त्या ठिकाणी श्री. काटकर व इतर पोलीस कर्मचारी यांनी डिझेल लहान टाकीत काढणे थांबविले. त्या टँन्करचा चालक जयवंत नावाचा इसम होता. श्री.काटकर आणि उप विभागीय अधिकारी श्री. गावडे यांनी टँन्कर चालकाला डिझेल कुठुन आणले आणि या ठिकाणी टाकीत का काढीत आहे त्याबद्दल विचारणा केली. टँन्कर चालक जयवंत यांनी विचारणा केल्यावर काय सांगितले मला आठवत नाही. त्यानंतर श्री. काटकर, उप विभागीय अधिकारी आणि इतर पोलीस कर्मचारी यांनी डिझेलचे नमुने घेवुन ते सिल केले. जमीनीत गाडलेल्या टाकीला सिल केले. उभ्या असलेल्या टँन्करला ताब्यात घेतले. टँन्कर, पाईप, मोटरपंप आणि इतर साहित्य यांना ताब्यात घेवुन जप्त केले. डिझेलसह टँन्कर जप्त केला किंवा कसे मला आठवत नाही. टँन्कर आणि टाकी मिळुन एकुण १,८०,०००/– चे डिझेल असेल.

(जयवंत मानेने विचारल्यावर काय सांगितले आणि टँन्कर आणि डिझेल जप्त केले का या मुद्दयावर साक्षीदाराची स्मृती ताजीतवाणी करण्याची सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी परवानगी मागितली. त्यांना सदरची परवानगी देण्यात येत आहे.)

२. जयवंत मानेने असे सांगितले की, "क्लिनर राजमोहम्मद शेख इस्माईल गायगाव येथील ऑईल डेपोमधुन ६००० लिटर पेट्रोल आणि ६००० लिटर डिझेल अग्रवाल यांच्या निंबा फाटा येथील पेट्रोल पंपावर पोहोचवण्यासाठी आलो होतो, त्यापैकी ६००० लिटर पेट्रोल व ३००० लिटर डिझेल निंबा फाटा पेट्रोलपंपावर उतरवले आणि उरलेले ३००० लिटर डिझेल कवठा बॅरेज येथील लोखंडी टाकीत उतरवण्यासाठी मॅनेजर कैलास खट्टी यांनी सांगितले, त्यानुसार आम्ही बॅरेज प्रोजेक्ट इंजिनिअर मंजुन्नाथ पटन शेट्टी यांचे सोबत कवठा येथे आलो व डिझेल लोखंडी टाकीमध्ये खाली करु लागलो, अंदाजे १००० लिटर डिझेल उरवले असेल इतक्यात तेथे पोलीस आल्याने आम्ही आमचे काम थांबविले.'' त्यानंतर डिझेल असलेले टँन्कर व इतर साहित्य तसेच टँन्कर मधील डिझेल व जमीनीत गाडलेल्या लोखंडी टाकीमधील डिझेल असे एकुण ३००० लिटर डिझेल ताब्यात घेतले आणि जप्त केले. जप्त केलेला सर्व मुद्देमाल आणि आरोपींना घेवुन पोलीस स्टेशनला आलो. जप्त केलेला मुद्देमाल मला दाखविल्यास मी ओळखु शकेल. मला जप्त केलेल्या मुद्देमाल पैकी मोटरपंप वस्तु नि. अ दाखविण्यात आला, तो तोच आहे. घटनेच्या वेळी हजर असलेल्या आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकेल. आजरोजी न्यायालयात ३ आरोपी हजर असुन आरोपी क्र. ४ गैरहजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एन.एम.अग्रवाल यांचे मार्फत**

३. हे म्हणणे खरे आहे की, माझी नेमणुक चालक म्हणुन असल्याने माझे काम सरकारी वाहन चालवायचे, वाहन थांबविण्यासाठी सांगितल्यास वाहन थांबविण्याचे आणि वाहनात बसुन राहण्याचे होते. साक्षीदार पुन्हा सांगतात की, साहेबांनी बोलविल्यास त्यांच्या सोबत जावे लागत होते. मी कवठा बॅरजे पाहिलेला आहे. त्या बॅरेजची खोली जमीनीपासुन २०–२५ फुट आहे. त्या धरणाच्या बांधकामासाठी पोकलॅन्ड आणि जे.सी.बी. इत्यादी अवजड वाहनांनी माती काढली जाते. माझे बयान नोंदविण्यात आले

होते. मी माझे बयानात मी घटनेच्या दिवशी चालक म्हणुन कर्तव्यावर होतो आणि मी श्री. काटकर आणि इतर पोलीस कर्मचारी यांना सरकारी वाहनाने कवठा बॅरेज येथे नेल्याचे सांगितले नव्हते. घटनेनंतर किती दिवसांनी माझे बयान नोंदविण्यात आले होते ते मला आठवत नाही. माझे बयान पोलीस स्टेशनला नोंदविण्यात आले होते. श्री. काटकर यांचे रायटर यांनी माझे बयान लिहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४.११.२०१४ रोजी मी कर्तव्यावर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४.११.२०१४ रोजी माझ्या समक्ष कोणतीही घटना घडली नाही आणि मी घटनास्थळावर गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही आणि काहीही जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे बयान लिहिण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटा पुरावा दिलेला आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.टी.इंगळे यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, मी चालक असल्याने मला घटनेबद्दल काही माहित नही असे म्हणणे योग्य होणार. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. आरोपी क्र. १ ते ३ यांच्या तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र. ४ कडुन मान्य करण्यात आला.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.05.10 15:19:59 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. ०७/०५/२०२५

<u>सं. फौ. ख. क्र.३०/२०१५</u> निशाणी ८४

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ६ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – संजय मधुकर भंडारी

वय – ६३ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त पो.उप निरिक्षक

पत्ता – शिवनेरी नगर, बुलढाणा, ता. जि. बुलढाणा.

**<u>सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि. २४.११.२०१४ रोजी मी पोलीस स्टेशन, उरळ येथे पो.उप निरिक्षक म्हणुन कार्यरत होतो. तेथे कार्यरत असतांना उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. गावडे हे तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला आले होते. उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. गावडे यांनी विना परवाना डिझेलची अवैध साठवणुक केल्याबद्दलची लेखी तक्रार दिली होती. त्यांनी तक्रारीत नमुद असलेलया चार आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. आता मला लेखी फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. मी श्री. गावडे यांची सही ओळखतो. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ८५** देण्यात येते. त्यावरुन छापील प्रथम खबर नोंदविण्यात आली. त्यावर श्री. गावडे यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ८६** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एन.एम.अग्रवाल यांचे मार्फत</u>**

२. घटनेच्या वेळी श्री. काटकर हे सहा.उप निरिक्षक म्हणुन उरळ पोलीस स्टेशनला कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यापुर्वी मी कोणतीही प्राथमिक चौकशी केली नाही. मी श्री. गावडे यांना त्यांना सदर फिर्याद बाबत चौकशी करण्याचे होते किंवा नाही त्याबाबत विचारणा केली नाही. श्री. गावडे यांच्या नावाने केंद्र शासनाने पेट्रोलियम पदार्थाची साठवणुक किंवा वाहतुक करण्याचे चौकशी करण्याचे अधिकार राजपत्र जारी करुन देण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री. गावडे माझे वरिष्ठ अधिकारी असल्याने त्यांनी जशी तक्रार आणुन दिली तशीच्या तशी मी नोंदवुन घेतली. साक्षीदार पुन्हा सांगतात की, त्यांनी श्री. गावडे यांच्याकडे फिर्यादबद्दल विचारुन पडताळणी केली होती.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.टी.इंगळे यांचे मार्फत</u>**

३. आरोपी क्र. १ ते ३ यांच्या तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र. ४ कडुन मान्य करण्यात आला.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.05.10 15:20:06 +0530

बाळापूर.
दि. ०७/०५/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.